**पोलीस अधिक्षक, पुणे ग्रामीण यांचे कार्यालय,**
चव्हाणनगर, पाषाण रोड, पुणे - ४११ ००८
दुरध्वनी क्रमांक ०२०-२५६५७८७८ फॅक्स क्र.०२०-२५६७४६४१
ई मेल - sp.pune.r @maha.gov.in

---

क्र.- पशा-८/पोकनि/पुस्तक अनुदान-१७-१८/२०१७, १४२७७
पुणे, दिनांक-३१/०७/२०१७.

संदर्भ :- मा. पोलीस महासंचालक,महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालयाकडील पत्र क्र.
१) पोमसं/२८-अे/४९३७/पो.क.नि.नियमावली/४२(१२)/२०१५, दि. २९/०७/२०१५.
२) परि. क्र. पोमसं/२८-अे/४९३७/मपोकनिस बैठक-पुस्तक अनुदान/४३९(०५)/२०१५, दि.७/४/१६.

विषय :- पोलीस कल्याण निधीत अंतर्गत पुस्तक अनुदानाबाबत. ( वित्तीय वर्ष २०१७-१८ )

००००

उपरोक्त संदर्भ व विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, या आस्थापनेवर कार्यरत असलेले पोलीस अधिकारी/ कर्मचारी/ मंत्रालयीन अधिकारी/कर्मचारी यांचे पाल्यांना २०१७-१८ या शैक्षणिक वर्षाकरिता लगतच्या शैक्षणिक वर्षातील ( २०१६-१७ ) आंतिम परिक्षेत खालीलप्रमाणे प्राप्त गुणांच्या आधारे व संदर्भीय परिपत्रकातील तरतूदीनुसार पोलीस कल्याण निधीतुन पात्र पोलीस पाल्यांसाठी पुस्तक अनुदान देणेत येणार आहे.

| अ. क्र. | अभ्यासक्रम | पुस्तक अनुदानासाठी आवश्यक गुणांची टक्केवारी | मिळणारे अनुदान |
|---|---|---|---|
| १. | इयत्ता ५ वी ते १० वी | ८५% किंवा प्रमुख ६ विषयापैंकी ३ विषयात किमान A-२ श्रेणी | रुपये १०००/- |
| २. | इयत्ता ११ वी ते १२ वी | ८०% | रुपये २०००/- |
| ३. | पदवी/पदव्युत्तर पदवी ( कला, वाणिज्य, विज्ञान ), LL.B., MBA, BBA, BCA, MCA, DBM, D.ED., B.ED., M.ED., CA., BSC-IT, BMS, Hotel Management, Computer Degree, Diploma, ITI etc. | ७०% | रुपये ३०००/- |
| ४. | अभियांत्रिकी पदविका ( Diploma ) | ६५% | रुपये ३०००/- |
| ५. | वैदयकीय पदविका ( Diploma ), D- Pharm. | ६५% | रुपये ३०००/- |
| ६. | अभियांत्रिकी पदवी ( Degree ) BE, पदव्युत्तर पदवी ME. | ६५% | रुपये ७०००/- |
| ७. | वैदयकीय/ पशुवैदयकीय पदवी/B-Pharm/M-Pharm पदवी (Degree), पदव्युत्तर पदवी | ६५% | रुपये १५,०००/- |

सर्व प्रभारी अधिकारी यांनी त्यांचे अधिपत्याखालील सर्व पोलीस अधिकारी/कर्मचारी ( पोलीस निरीक्षक ते पोलीस शिपाई )/ मंत्रालयीन अधिकारी/कर्मचारी यांना उपरोक्त तक्त्यात नमुद केलेप्रमाणे सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षाच्या आंतिम परिक्षेच्या गुण पत्रिकेची साक्षांकीत प्रत रिपोर्टासह मार्फतीने १५ दिवसांत निश्चीतपणे सादर करणेबाबत निर्देश द्यावेत.

( बरकत मुजावर )
पोलीस उपअधिक्षक मुख्यालय
पोलीस अधीक्षक,पुणे ग्रामीण यांचेकरिता.